MHNS160015492023

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २३१/२०२३ मध्ये निशाणी २२ खाली आदेश</u>**

**ज्योती आहेर वि. शुभम आहेर**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी विलंब माफ होऊन त्यांच्याविरुद्ध झालेला नो–से चा हुकूम रद्द होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये प्रतिवादींनी कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा सरस–निरस मानाने वाटप होऊन तुटक कब्जा घेण्यासाठी व निरंतरच्या ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे समन्स प्रतिवादींना दि.२३.१२.२०२३ रोजी मिळाले व त्यानुसार प्रतिवादी दि.२७.०६.२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. मात्र प्रतिवादींना कैफियतीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना ९० दिवसामध्ये कैफियत दाखल करता आली नाही. वादी प्रतिवादींमध्ये तडजोडीचे देखील बोलणे चालू होते. त्यामुळे प्रतिवादींना वेळेमध्ये प्रस्तुतकामी त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करता आले नाही.

२. पुढे प्रतिवादींनी कथन केले आहे की, सदरचा झालेला विलंब हा जाणीवपूर्वक केलेला नसल्यामुळे त्यांच्याविरुद्ध झालेला नो–से चा आदेश रद्द करुन त्यांना त्यांची कैफियत अभिपटलावर मांडण्याची संधी देण्याची विनंती सदर अर्जाद्वारे प्रतिवादींनी केलेली आहे.

३. प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. संचिकेच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र. १ ते ४ दि.२७.०६.२०२४ रोजी हजर झाले. मात्र ९० दिवसानंतर देखील प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे

त्यांच्याविरुद्ध नो–से चा हुकूम दि.२१.११.२०२४ रोजी पारित करण्यात आला. मात्र त्यानंतर देखील प्रतिवादींनी सदरचा अर्ज पुन्हा दोन महिन्याच्या विलंबाने दिलेला आहे. त्यावरुन देखील हे स्पष्टपणे दिसून येते की, प्रतिवादींमुळे सदरचे प्रकरण विनाकारण लांबणीवर पडले आहे. मात्र सदरचा दावा दिवाणी असल्यामुळे प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे कायद्यानुसार गरजेचे आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसार होणार नाही. उलट दाव्याच्या योग्य निर्णयासाठी ते सहायभूतच ठरणार आहे. मात्र या प्रतिवादींमुळे सदर प्रकरणात जो विलंब झालेला आहे. त्यासाठी त्यांच्यावर दंड आकारणी करणे न्यायोचित ठरेल. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– आदेश –**

१. प्रतिवादी क. १ ते ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज त्यांनी वादींना रक्कम रुपये ५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी सदरची दंडाची रक्कम भरल्यानंतरच त्यांची कैफियत व म्हणणे अभिपटलावर घेण्यात येईल याची प्रतिवादींनी नोंद घ्यावी.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.12 11:46:26 +0530

दिनांक :– १०.०३.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.